डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ ९०८ /२०२६ दि.१८/०५/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

ज्याअर्थी, डोंबिवली वाहतूक उपविभाग हददीत मोठागाव रेल्वेफाटक क्रासिंग दरम्यान, रेती बंदर रोड, डोंबिवली प. येथे एक्सप्रेस फाईट रेल्वे कन्सोर्टीयम यांचेकडुन रेल्वे ट्रक बाबत रेल्वेचे अत्यावश्यक काम होणार आहे. सदरचे काम दिनांक १९/०५/२०२६ ते दिनांक २१/०५/२०२६ रोजीपावेतो रात्रौ ००:०१ ते सकाळी ०६:०० वाजेपावेतो करण्यात येणार आहे. सदरवेळी मोठागाव रेल्वे फाटक दरम्यान दोन्ही बाजुस वाहतुक बंद करून खालील प्रमाणे मार्गाने वळविणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद –	**१)** स्वामी नारायण सिटी चौक येथुन मोठागाव रेल्वेफाटक क्रॉसिंग, रेती बंदर रोड, डोंबिवली प. कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **पाण्याची टाकी, नवीन कोपर गाव क्रॉस रोड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने उजवे वळण घेवुन नवीन कोपर गाव क्रॉस रिंगरोडने इच्छीत स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**२)** पं. दिनदयाळ उपाध्ये मार्ग व रेतीबंदर रोड कडुन मोठागाव रेल्वेफाटक क्रॉसिंग कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **रेतीबंदर चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने पं. दिनदयाळ उपाध्ये मार्गाने पुढे म. गांधी रोड – कोपर रोड – नवीन कोपर गाव क्रॉस रिंगरोडने रेल्वे फाटकाच्या पलिकडे इच्छीत स्थळी जातील.

सदरची अधिसुचना **दिनांक १९/०५/२०२६ रोजी ते दिनांक २१/०५/२०२६ रोजी पावेतो रात्रौ ००:०१ ते सकाळी ०६:०० वाजेपावेतो** अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर
ठाणे पोलीस पत्रक.
प्रत :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/— सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.
प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.
प्रत :— स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि डोंबिवली वाहतूक उपविभाग.
२/— म.न.पा.कल्याण—डोंबिवली च्या संबंधीत अधिका—यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.